# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.02.2026** **वार- सोमवार**

---

**विधीमंडळ**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणानं सुरुवात झाली. यावेळी राज्यपालांनी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा मांडला.
विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला. अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडणं हा आपल्यासाठी भावनिक क्षण आहे, त्यांच्यासारख्या सहकाऱ्याचं निधन, ही केवळ राजकीय हानी नाही, तर व्यक्तिशः प्रचंड वेदनादायक बाब आहे, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत व्यक्त केली.

विविध पक्षांच्या नेत्यांनीही शोक प्रस्तावावरच्या चर्चेत भाग घेतला. त्याआधी मुख्यमंत्र्यांनी उपमुख्यमंत्री आणि राज्य उत्पादन शुल्क मंत्री सुनेत्रा पवार यांची सभागृहाला ओळख करून दिली.
विधानपरिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला. यावेळी शिंदे यांनी अजित पवार यांच्या कार्याला उजाळा दिला.

**पुणेमनपा**

पुणे महापालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भाजपचे श्रीनाथ भिमाले यांची आज बिनविरोध निवड झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक सुहास टिंगरे यांचा उमेदवारी अर्ज एक मिनिट उशिरा दाखल झाल्याचं कारण देत अवैध ठरविल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली. महापालिकेच्या १६ सदस्यीय स्थायी समितीमध्ये भाजपचे संख्याबळ १२ असल्याने अध्यक्षपदाची निवडणूक केवळ औपचारिक होती.

**Pcmc**

शिक्षण, स्वच्छता आणि सामाजिक न्यायासाठी सर्वस्व अर्पण करणारे, आणि अंधश्रध्दा, अनिष्ट रूढी-परंपरांच्या विरोधात जनजागृती करणारे, राष्ट्रीय संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात त्यांना अभिवादन करण्यात आलं.

संत गाडगेबाबा यांच्या विचारांचा आदर्श घेत नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करणं ही आजच्या काळातली खरी गरज आहे, असं प्रतिपादन पिंपरी चिंचवडच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केलं.
महापौर रवी लांडगे, आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कु-हाडे, यांच्या उपस्थितीत सात मावळे संवर्धन संस्थेमार्फत आज इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान राबवण्यात आलं.

**छात्रसंसद**

विकसित भारत निर्माण करण्यासाठी युवा पिढीने प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्टतेसाठी प्रयत्न केले पाहिजेत, असं भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ यांनी म्हटलं आहे. एमआयटी विश्वशांती विद्यापीठानं आयोजित केलेल्या १५व्या भारतीय छात्र संसदेमध्ये ते आज बोलत होते. लोकशाही हा देशाचा आत्मा आहे; या लोकशाहीचे रक्षक म्हणून तरुणांनी काम करावं असं आवाहन त्यांनी केलं.

**पुरस्कार**

पुण्यातील तालचक्र ट्रस्टच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या उस्ताद ज़ाकीर हुसैन एक्सलन्स पुरस्कारांची आज घोषणा करण्यात आली. 2025 या वर्षासाठी ज्येष्ठ बासरीवादक पंडित हरिप्रसाद चौरसिया यांना तर 2026 या वर्षासाठी ज्येष्ठ सरोदवादक उस्ताद अमजद अली खान यांना, उस्ताद ज़ाकीर हुसैन एक्सलन्स पुरस्कारानं सन्मानित करण्यात येणार आहे. प्रसिद्ध गीतकार, लेखक जावेद अख्तर यांच्या हस्ते येत्या ९ मार्च रोजी पुण्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. तालचक्र ट्रस्टचे विश्वस्त पंडित विजय घाटे यांनी आज ही माहिती दिली.

**जिल्हापरिषद शाळा**

अक्षरसृष्टी संस्थेच्या मदतीने पुण्यातल्या पुरंदर तालुक्यातल्या जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल गुजरातमध्ये अहमदाबाद इथं नेली होती. ग्रामीण भागातील या मुलांनी विमानातून प्रवास करत सायन्स सिटी, नेचर पार्क, नरेंद्र मोदी स्टेडियम, अक्षरधाम लाइट शो, अशी महत्त्वाची ठिकाण पहिली. दुर्गम भागातल्या विद्यार्थ्यांना भारताचा गौरवशाली वारसा आणि आधुनिक भारताचं दर्शन घडवण्यासाठी अशा सहली आयोजित केल्या जातात, असं अक्षरसृष्टी संस्थेचे अध्यक्ष  सिद्धनाथ पवार यांनी सांगितलं.

**सीए**

कॉस्ट अकाउंटंट्स हे देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारं, आव्हानात्मक क्षेत्र आहे; या क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी सखोल ज्ञान मिळवावं आणि नीतिमूल्याची जपणूक करण्याला प्राधान्य द्यावं, असं आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी केलं. दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंट्स ऑफ इंडियाच्या पुणे शाखेतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 35 तर किमान 17 अंश सेलसियस तापमानची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमान असेल तसंच आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता , ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**